जगभर

# दुष्काळ – पश्चिमेतील

**चंद्रशेखर पुरंदरे**

एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात लंडनपासून उत्तरेच्या एका गावापर्यंत जवळजवळ दोनशे किलोमीटर रेल्वेने प्रवास झाला. पिवळ्या फुलांनी बहरलेली तेलबियांची शेते सोडता बाकी सगळे हिरवे हिरवे गार गालिचे, हरित तृणाच्या मखमालीचे. हिवाळ्याचे दोन-तीन महिने सोडता ग्रामीण इंग्लंडचे हे नेहमीचे चित्र. त्यात यावर्षीही फरक नाही. यावर्षीचा विशेष म्हणजे हा सगळा प्रदेश, किंबहुना अर्धे इंग्लंड दुष्काळी म्हणून जाहीर झाले आहे. मात्र भेगा पडलेल्या रखरखीत जमिनी, बोडके डोंगर, कोरडे ओढे आणि अध्येमध्ये हाडे निघालेली माणसे आणि जनावरे हे दुष्काळाचे भारतीय चित्र कोठेच दिसत नाही.

नैसर्गिक आपत्तीची संभाव्यता कळली की लवकर जागे होणे हे विकसित समाजाचे एक लक्षण. जागे झाल्यावर उपाययोजना करण्यासाठी सर्व संबंधित घटकांना निर्णयप्रक्रियेत सामील करून घेणे हे दुसरे लक्षण आणि सर्वसंमतीने प्रश्नावर तातडीने उपाययोजना करणे हे तिसरे लक्षण. यात संबंधितांच्या अंतर्गत रस्सीखेची, हेवेदावे, अंमलबजावणीतील देवघेवी असतील पण शेवटी आपण लोकांना उत्तरदायी आहोत ही जाणीव असते आणि पावलोपावली भ्रष्टाचार नसतो.

मागच्या वर्षीच्या कमी पावसामुळे यावर्षी ब्रिटनमध्ये पाणीटंचाई आली. त्याबद्दलच्या उपाययोजनेचा आराखडा मागच्या नोव्हेंबरमध्येच तयार होता आणि तो मार्चपासून अंमलात आला. याही वर्षी पाऊस कमी पडला तर २०१३ च्या उन्हाळ्यासाठी काय करायचे याचे तीन-चार आराखडे आताच तयार आहेत. (पाऊस सरासरीच्या ८०% पडला, तीन महिने पडला; ७०% पडला, दोन महिनेच पडला अशा शक्यतांवर आधारित आराखडे)

पाण्याशी संबंधित अनेक नियंत्रक-संघटना आहेत. केंद्र सरकार, स्थानिक सरकार, नागरी संघटना, पर्यावरणतज्ज्ञ, जलतज्ज्ञ आणि पाण्याचा उपसा, साठा व वितरण व्यापारी तत्त्वावर करणाऱ्या खासगी कंपन्या अशा अनेकांचा यात समावेश होतो. अंतिम निर्णय पर्यावरण खात्याचा असतो. त्या खात्याला विभिन्न ग्राहकांच्या गरजा शक्य तेवढ्या भागवण्याची कसरत करावी लागते. दुष्काळाची जाणीव, प्रतिमा व परिणाम शहरात निराळ्या, खेड्यात निराळ्या; उद्योगात निराळ्या आणि शेतीत निराळ्या. दुष्काळग्रस्तता सगळीकडे सारखी नसते.

ब्रिटनमधला दुष्काळ आज तितकासा भयानक दिसत नाही व नजीकच्या भविष्यातही दिसत नाही. पाणी मुबलक नसेल पण पुरेसे आहे. त्याचे नियोजन काळजीपूर्वक केले तर जीवनपद्धतीत आमूलाग्र बदल करावा लागणार नाही या गृहीतावर पर्यावरण खात्याचे प्रयत्न गेले काही महिने युद्धपातळीवर चालू आहेत.

नियोजनासाठी पाण्याशी निरनिराळ्या प्रकारे संलग्न असणाऱ्या सहा घटकांचा विचार घेतला जातो. पुरवठा करणाऱ्या खासगी कंपन्या, शेती, वीजनिर्मिती व उद्योगक्षेत्र, नौकानयन, पर्यावरणाच्या दृष्टीने पाणी आणि टंचाईचा परिणाम होणारे प्राणी-पक्षी-मासे.

जेथे टंचाई तीव्र आहे किंवा तीव्र होणार आहे तेथे पाणी-पुरवठा करणाऱ्या खासगी कंपन्यांना सार्वजनिक जलस्रोतातून जास्तीचा उपसा करण्याचे परवाने देण्यात आले आहेत. पाईपलाईनमधून किंवा जलाशयातून होणारी गळती कमीत-कमी करणे कंपन्यांना बंधनकारक आहे. तसे ग्राहकांनी पाणी जपून वापरावे यासाठी कंपन्यांनी काय प्रयत्न केले हेही परवाने देण्याआधी तपासण्यात येते. ग्राहकांनी पाणी कमी वापरावे यासाठी काही प्रकारच्या पाण्याचा वापर बंद करण्यात आला आहे. उदाहरणार्थ, ब्रिटनमध्ये मध्यमवर्ग (आणि अर्थातच उच्च वर्ग) यांची घराची कल्पना सभोवतालच्या हिरवळीखेरीज अपुरी रहाते. हा या संस्कृतीचाच भाग आहे. पण पाण्याच्या दुर्भिक्ष्याने या 'मूल्या'चा फेरविचार होत आहे. हिरवळ हिरवी ठेवण्यासाठी आठवड्यातून दोनदा तरी होझ पाईपने (hose pipe) पाणी घालावे लागते. होझ पाईपच्या वापरावर आता काही भागांमध्ये बंदी घालण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी एका राजकीय नेत्याच्या बागेतील होझ पाईप बंद करायचा राहिला होता आणि पाणी वाया जात होते. त्याचे फोटो वर्तमानपत्रात लगेच आले आणि जरा गडबड झाली. दर शनिवार-रविवारचे इंग्लंडमधील टिपिकल चित्र म्हणजे जो तो निष्ठेने घराबाहेर मोटारगाडी घासून पुसून लख्ख करत असतो. हाही संस्कृतीचा भाग. त्यासाठीही पाईपने बरेच पाणी वापरले जाते. श्रीमंती क्रीडाकेंद्रात पाण्यावरचे खेळ असतात. त्यावरही गदा आली आहे.

खासगी कंपन्यांच्या दृष्टीने लोक हे ग्राहक असले तरी त्यांच्या बेलगाम पाणी वापरातून नफा तर वाढेल असा अदूरदर्शी हिशेब त्यांना करता येणार नाही इतपत सरकारी वचक असतो. त्यामुळे अधिक क्षमतेने पाणीपुरवठा करणे, जुन्या किंवा बंद केलेल्या बोअरवेल्स दुरुस्त करणे, ग्राहकांना कमी पाणी वापरायला भाग

पाडणे या सगळ्या अटी कंपन्यांना मान्य कराव्या लागतात. त्यांची यंत्रसामुग्री ठीक चालते आहे ना, याचे भ्रष्टाचार नसलेले सरकारी परीक्षण असते.

शेतीबाबत पाण्याची परिस्थिती गंभीर आहे. नद्या किंवा जलाशयातील नेहमीची पातळी गाठली जाणे असंभवीय आहे. हिवाळ्यातले दुसरे पीक बहुधा येणारच नाही. ठिबक सिंचनाचा पर्यायही बहुतेक ठिकाणी जमणार नाही. फळे, बटाटे अशा पाणी जास्त लागणाऱ्या उत्पादनावर याचा अनिष्ट परिणाम होणार. नदीतून शेतीसाठी स्वत:च पाण्याचा उपसा करण्यासाठी शेतकऱ्यांना एक परवाना दिलेला असतो. त्यात दुष्काळामुळे नवी तरतूद करण्यात आली आहे. नदीच्या पाण्याची पातळी एका विशिष्ट मर्यादेखाली गेल्यास हा उपसा कमी तरी करायचा किंवा पूर्णपणे थांबवायचा अशी अट आता घालण्यात आली आहे. त्यायोगे इतर ग्राहकांनाही काही प्रमाणात पाणी मिळते राहील. (या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की प्रत्येक नैसर्गिक संसाधनाच्या वापरावर व उत्सर्गावर सरकारी नियंत्रण असते. चोरीच्या विजेवर विहिरीचा पंप सर्रास चालवण्यासारखे प्रकार इथे एरवीही अशक्यप्राय असतात, टंचाईच्या काळात तर पाण्याचा एकही थेंब वाया जाणार नाही हे पहाणारी यंत्रणा, परत, क्षुद्र भ्रष्टाचारी नसते.) ब्रिटनमध्ये लोकरीसाठी मेंढ्या व मांसासाठी गाई, डुकरे, कोंबड्या वगैरे पाळीव प्राण्यांची पैदास मोठ्या प्रमाणावर होते. कुरणांवरील गवत कमी झाल्याने, या प्राण्यांना मिळणारे पाणी कमी झाल्याने ही पैदासही कमी होईल.

शेतकऱ्यांनी पाण्याचे टँक आताच बांधावेत, जमिनीचा ओलावा वेळोवेळी मोजून किमान आवश्यक एवढेच पाणी वापरावे, share-conserve-adopt या त्रिसूत्रीचा वापर करावा इत्यादी मार्ग सुचवण्यात येत आहेत.

ब्रिटनमध्ये कालव्यांमधून नौकानयन मोठ्या प्रमाणावर होते. काही ठिकाणी ही वाहतूक धोक्यात येईल इतकी पाण्याची पातळी खाली गेली आहे त्यामुळे कालव्यांच्या वापरांच्या दरदिवशीच्या तासांवरही मर्यादा घालण्यात आली आहे.

पर्यावरण, पाणी व वन्य जीवनाच्या संदर्भात काही वनस्पती नष्ट होऊ शकतात. पाण्याचे प्रमाणच कमी झाल्याने एरवी उत्सर्गातील विषारी पदार्थांची तीव्रता कमी होते, ती होणार नाही व जलजीवन काही प्रमाणात धोक्यात आले आहे. एका ठिकाणी एका नदीतील सगळे मासे इतरत्र हलवण्यातही आले.

वरील विवेचनावरून विकसित देशातील दुष्काळादरम्यान पाण्याचे नियोजन कसे होत आहे हे लक्षात यावे.

आता या नियोजनातील अंतर्भूत मर्यादा पाहू. सरकार व खासगी कंपन्या हे यातील प्रमुख घटक. लोकांच्या पाणीवापरावर नियंत्रण करण्यासाठी आधी विनंती मग रेशनिंग हे सरकारचे धोरण. पण त्याबरोबरच लोकांकडे सरकार 'मतदार' म्हणून पहाते. त्यामुळे या धोरणाच्या कठोरपणावर मर्यादा पडते. खासगी कंपन्या लोकांकडे ग्राहक म्हणून पाहतात व तेथेही हीच मर्यादा पडते. लोकांना जबाबदारीने वागायला सांगणे वेगळे आणि भाग पाडणे वेगळे. शिवाय इतर कर्तृत्वाने या दोन्ही संस्थांची विश्वासार्हता जनमानसात खालावलेली आहे. लोकशाहीतील तिसरी संस्था म्हणजे प्रसार-माध्यमे. त्यांनी या प्रश्नाचे गांभीर्य लोकांपर्यंत पोचवले आहे. पण त्यांची विश्वासार्हता इतर दोन संस्थांपेक्षाही खाली गेल्याने ही 'लांडगा आला रे आला' अशी हाकाटी तर नाही, असाही संदेह आहे.

खासगी कंपन्यांबाबत एक मुद्दा लक्षात ठेवायला हवा. तो म्हणजे त्यांची मालकी. जागतिकीकरणादरम्यान अनेक फक्त-ब्रिटिश पाणीपुरवठा कंपन्यांची मालकी पूर्णपणे ब्रिटिश राहिलेली नाही. लंडनला पाणीपुरवठा करणाऱ्या थेम्स (Thames) वॉटर कंपनीत आठ टक्के समभाग एका चिनी कंपनीचे आहेत. तर हाँगकाँगमधील एका चिनी माणसाची कंपनी नॉर्दम्ब्रिया (Northumbria) या उत्तर इंग्लंडमधील परगण्यातील पाणीपुरवठा करते. एक कॅनेडियन फंड दक्षिण इंग्लंडमधील ब्रिस्टॉल शहराचा पाणीपुरवठा करतो. या परकीय कंपन्यांची निष्ठा एतद्देशीय कंपन्यांइतकीच 'देशभक्त' असते का हा एक मुद्दा. दुसरे म्हणजे, त्यांच्या मालकीचे जाळे गुंतागुंतीचे व जगभर पसरलेले असते. म्हणजे, या कॅनेडियन कंपनीने मेक्सिकन बाँडस्‌मध्ये गुंतवणूक केली आणि ते बाँडस् बुडाले तर कॅनेडियन कंपनी धोक्यात येते आणि ब्रिस्टॉलचा पाणीपुरवठा धोक्यात येतो. आपल्याकडच्या पेक्षा इथले सरकार अधिक लोकाभिमुख असल्याने अगदी पाणी बंदच होण्याची वेळ येणार नाही पण अशा गुंतवणुकींमुळे नियंत्रण जगाच्या दुसऱ्या टोकाला गेलेले आहे हे लक्षणीय.

एकूण चित्र पाहता, जागतिक अर्थव्यवस्था एकदम धोक्यात आली त्या चार-पाच वर्षांपूर्वीपर्यंत चंगळवादी जीवनशैली बहरात होती. मग त्यावर टीका होऊ लागली. उदाहरणार्थ सामान्य कॅनेडियन किंवा अमेरिकन सामान्य भारतीयाच्या ३०-३५ पट पाणी दरदिवशी दरडोई वापरतो. या सवयी सोडा नाहीतर संपन्न भूप्रदेश दग्धभू व्हायला वेळ लागणार नाही हा इशारा आता देण्यात येत आहे. आज हिरवळींना पाणी घालणे असो किंवा गाड्या धुणे असो; पुढच्या टप्प्यावर सामिष आहार, वातित पेये या सवयींचेही परीक्षण होत आहे. तरीही मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधणार या प्रश्नाने सरकार, खासगी कंपन्या व प्रसारमाध्यमे बिचकलेली दिसतात.

*E-mail - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*